बंगळुरू हे शहर भारतातील सिलिकॉन व्हॅली म्हणून ओळखले जाते. येथे भारतातील सर्वात कुशाग्र मेंदू काम करतात. ते सारे संगणक विश्वातील आहेत. याच बंगळुरु शहरात काल अचानक बॉंबस्फोट झाला आणि त्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. देशात सध्या सर्वत्र लोकसभा निवडणुकांचे वातावरण आहे आणि अशा काळात सिलिकॉन व्हॅली म्हणून म्हटल्या जाणार्या भागात बॉंबस्फोट व्हावेत, ही निश्चितच चिंतेची बाब आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही या स्फोटांच्या बातमीस दुजोरा दिला आहे. त्या स्फोटात किमान ९ जण जखमी झाले. अगोदर सांगण्यात आल की हा सिलिंडर स्फोटाचा प्रकार होता. परंतु नंतर हा कमी तीव्रतेचा आयईडी स्फोट होता, यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास एक युवक पिशवी ठेवून गेला आणि त्यानंतर काही वेळातच स्फोट झाला. कर्नाटक राज्यातील बिघडत्या कायदा आणि सुव्यवस्थेचा हा ठळक प्रकार आहे. कर्नाटकात कॉंग्रेसचे सरकार आहे. कॉंग्रेसवर थेट आरोप करता येत नसला तरीही ही बाब स्पष्ट आहे की कॉंग्रेसची सत्ता असलेल्या राज्यात दहशतवादी तत्वांना ढिले सोडले जाते किंवा त्यांच्यावर ठोस अशी कारवाई केली जात नाही. हा स्फोट कमी तीव्रतेचा असला तरीही त्याचे गांभिर्य कमी होत नाही. त्यातही बंगळुरू शहर हे संगणक तज्ञांचे असल्याने तेथे स्फोट घडवून भारताच्या संगणक विश्वातील प्रगतीला बाधा पोहचवण्याचा हा प्रकार असू शकतो. त्या दृष्टीने या प्रकरणी तपास व्हायला हवा. भारत लवकरच पाच ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याच्या दृष्टीने निघाला असताना हा प्रकार होणे म्हणजे भारत विरोधी ताकदींचा हा घातपाताचा डाव असणे उघड आहे. ज्या रामेश्वर भागात हा स्फोट झाला, त्या भागात भारतातील सारे संगणक तज्ञ काम करतात. त्यांसाठी हा क्रीम एरिया आहे. सर्व जगाचे लक्ष आकर्षित करून घेण्यासाठी हा स्फोट घडवला असावा का, या वर विचार करणेही आवश्यक आहे. एक दिलासादायक बाब ही आहे की या स्फोटात कोणतीही मनुष्य हानी झाली नाही. अन्यथा अनर्थ ओढवला असता. राजकीय कारणही असू शकते. कर्नाटकात आताच कॉंग्रेसचे सरकार स्थापन झाले आहे. कॉंग्रेसच्या राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेच्या कशा चिंधड्या उडाल्या आहेत, हे दाखवण्यासाठीही हा स्फोट असू शकतो. भाजपने स्वाभाविकपणेच या स्फोटासाठी सिद्धरामय्या यांच्या सरकारला जबाबदार ठरवले आहे. त्यामुळे या स्फोटामागे कोणत्या शक्ती आहेत, याचा खोलपर्यंत तपास लावणे कर्नाटक सरकारसाठी अत्यंत आवश्यक आहे. त्यातूनच दूध का दूध आणि पानी का पानी होऊन जाईल. लोकसभा निवडणुकात जवळ आल्या असल्याने राज्यात कायदा आणि सुव्यवस्था कायम राखणे अत्यंत आवश्यक आहे. या स्फोटाम ागे ज्या कोणत्या ताकदी आहेत, त्यांच्या मागे राज्य सरकार किंवा मोदी सरकारलाही बदनाम करण्याचे षड्यंत्र असू शकते.या स्फोटाचा सर्वथैव दृष्टीने तपास करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. दक्षिण भाग हा पूर्वी शांत म्हणून ओळखला जायचा. आता तेथेही देशविरोधी तत्वांनी आपले अस्तित्व जाणवून देण्यास सुरूवात केली आहे. केरळ तर देशविरोधी तत्वांच्या अशा स्वरूपाच्या कारवायांसाठी बदनाम झाले आहे. त्यातच आता कर्नाटकची भर पडली तर अनर्थ ओढवेल. कॉंग्रेस सरकार असले की राष्ट्रविरोधी तत्वांसाठी ते आपले कुरण वाटत असते. त्यांच्यावर कारवाया करण्यास कॉंग्रेस सरकार सहसा तयार असत नाही, असा सर्वसाधारण समज पसरलेला आहे. कर्नाटकातील कॉंग्रेसचा या स्फोटाच्या मागे असणाऱ्या तत्वांना आशिर्वाद नसेल. पण तरीही त्यांनी आता या तत्वांविरोधात सौम्य धोरण स्वीकारता कामा नये. कारण कॉंग्रेसची सरकारे ही नेहमीच देशविरोधी तत्वांना आसरा देत असतात, हा गैरसमज दूर होण्याची तातडीने गरज आहे. त्यामुळे कॉंग्रेस सरकारला आता तातडीने या प्रकरणाचा तपास लावून या मागील शक्तींचा पर्दाफाश करण्याची गरज आहे. अन्यथा कॉंग्रेसला येत्या निवडणुकीत याचा दगाफटका होऊ शकतो. धार्मिक आधारावर देशात ध्रुवीकरण करण्याचा डाव कुणाचा आहे, हे समोर येण्याचीही गरज आहे. त्यामागे खरोखरच ध्रुवीकरण आहे की कॉंग्रेस किंवा भाजपला बदनाम करून निवडणुकीत त्याचा गैरफायदा उठवण्याचा हा प्रकार आहे काय, याचा शोध तातडीने लावण्याची अत्यंत आवश्यकता आहे. स्फोट दक्षिणेकडील राज्यात झाला आहे. नव्याने ही भूमी देशविरोधी तत्वांना सॉफ्ट भूमी होऊ पहात आहे का, याचाही विचार करण्याची गरज आहे. दक्षिणेतील राजकीय स्थिती ही नेहमीच भाजपला विरोधी राहिली आहे. त्यामुळे भाजपला बदनाम करण्याचे हे षड्यंत्र आहे की काय, य़ाचा शोध घेण्याचीही यासाठी आवश्यकता आहे कारण यामुळे संभ्रम राहिला तर साराच देश संभ्रमावस्थेत जाईल. त्यामुळे देशाचे जे नुकसान होईल, ते कधीही भरून न येणारे असेल. मनुष्यहानी झाली नाही म्हणून किरकोळ म्हणून या प्रकाराकडे झटकून टाकता येणार नाही. त्यामागील शक्तींचे नाटक उघड केले पाहिजे. तरच कर्नाटक राज्य हे सुखासमाधाना नांदू शकेल.

# टायर गोदाम स्फोट प्रकरणाचा छडा लावण्यात सांगोला पोलिसांना यश

सोलापूर : सांगोला तालुक्यातील महूद येथे टायरच्या गोदामात स्फोट होऊन लागलेल्या आगीच्या प्रकरणाचा छडा लावण्यात सांगोला पोलिसांना यश आले आहे. जागा मालकासह टायर दुकानदाराने विमा कंपनीची दोन कोटी ४५ लाख रुपयांची फसवणूक करून आर्थिक लाभ मिळवण्याच्या उद्देशाने हे कट कारस्थान रचल्याचे निष्पन्न झाले आहे.यामध्ये टायर गोदाम ला आग लावण्यासाठी त्यांनी प्लास्टिक सोल्युशन व पेट्रोलचा वापर केला आहे. या प्रकरणात सांगोला तालुक्यातील एकासह सांगली जिल्ह्यातील तिघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. यातील मुख्य सुत्रधार नितीन नरळे हा फरार आहे.

महूद-दिघंची रस्त्यालगत लक्ष्मीनगर(ता. सांगोला) येथील नितीन पांडुरंग नरळे यांच्या मालकीची इमारत आहे. या इमारतीमध्ये विठलापूर ता.आटपाडी जि.सांगली येथील रामेश्वर दत्तात्रय बाड यांचे टायरचे गोदाम होते.या गोदामात अतिशय मोठा स्फोटासारखा आवाज होऊन आग लागली होती.या स्फोटात रामेश्वर बाड याचा चुलत भाऊ अतुल आत्माराम बाड (वय २७,रा. विठलापूर,ता.आटपाडी जि. सांगली)हा डोक्याची कवटी फटून जागीच मरण पावला होता.

---

**हीरो हौसिंग फायनान्स लिमिटेड**

HeroHousing Finance

संपर्क पत्ता: युनिट क्र.१२, १ला मजला, एक्सलेन्सीया इमारत, लोधा सुप्रिमस, प्लॉट क्र.एफ-४, एफ-४/१, पांच पाखाडी, ठाणे, महाराष्ट्र-४१२०८. नोंदणीकृत कार्यालय: ०९, कम्युनिटी सेन्टर, बसंत लोक, वसंत विहार, न्यु दिल्ली-११००५७. दूर.:०११-४९२६७०००, टोल फ्री क्रमांक: १८०० २१२ ८८००, ई-मेल:customer.care@herohfl.com, वेबसाईट:www.herohousingfinance.com, सीआयएन:युद५१९२डीएल२०१६पीएलसी३०१४८

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)**

(परिशिष्ट ४ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ८(१) पहा)

**ज्याअर्थी, खालील स्वाक्षरीकर्ता हे सिक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शियल अॅसेटस् अॅन्ड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट २००२ अंतर्गत हीरो हौसिंग फायनान्स लिमिटेडचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचिता कलम १३(१२) अन्वये असलेल्या अधिकाराअंतर्गत त्यांनी वितरीत केलेल्या मागणी सूचनेनुसार कर्जदार यांना सदर सूचना प्राप्त तारखेपासून ६० दिवसांच्या आत देय रक्कम आणि त्यावरील व्याज जमा करण्यास सांगण्यात आले होते.**

कर्जदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस सूचना देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे कलम ८ सहवाचिता सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रूल्स, २००२ च्या नियम १३ चे उपकलम (४) अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **ताबा** घेतला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेसह खालील स्वाक्षरीकर्त्यांच्या अनुमतीशिवाय व्यवहार केलेला असल्यास त्यांनी **हीरो हौसिंग फायनान्स लिमिटेड** यांच्याकडे देय रक्कम आणि त्यावरील व्याज जमा करावे.

**कर्जदार यांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) च्या तरतूदीनुसार प्रतिभूत मालमत्ता सोडविण्यासाठी वेळ उपलब्ध आहे.**

| कर्ज खाते क्र. | कर्जदार/कायदेशीर वारसदार/ कायदेशीर प्रतिनिधीचे नाव | मागणी सूचना तारीख/ एकूण देय थकबाकी रक्कम (रु.) | ताबा दिनांक |
|---|---|---|---|
| HHFMUMHOU 20000010990 | जुनैद खान, नाजिया बेगम | ३०.११.२०२१, २५.११.२०२१ रोजी देय रु.१६,१६,९२०/- | ०२.०३.२०२४ (वास्तविक) |

**प्रतिभूत मालमत्ता/स्थावर मालमत्ता/तारण मालमत्तेचे वर्णन:** फ्लॅट क्र.२०४, क्षेत्रफळ २८.०४ चौ.मी. कार्पेट क्षेत्र, २रा मजला, विंग-सी, के. एम. अॅव्हेन्यु म्हणून ज्ञात इमारत क्र.९, जमीन सर्व्हे क्र.२७/१/ए, क्षेत्रफळ २८८०० चौ.मी. कार्पेट क्षेत्र, जमीन सर्व्हे क्र.२७/१/बी, क्षेत्रफळ ८००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/१/सी, क्षेत्रफळ ८००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.७५/२ भाग, क्षेत्रफळ २८८०० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/७, क्षेत्रफळ १५०० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.७/१/ए भाग, क्षेत्रफळ ४००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/३, क्षेत्रफळ २५०० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/५/बी भाग, क्षेत्रफळ २००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/४ भाग, क्षेत्रफळ ३५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/६, क्षेत्रफळ १००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/८, क्षेत्रफळ ८१० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१०, क्षेत्रफळ २५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१६, क्षेत्रफळ २८० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१७, क्षेत्रफळ ३३० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/५ए, क्षेत्रफळ २००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/२ भाग, क्षेत्रफळ २५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/३, क्षेत्रफळ २५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/५, क्षेत्रफळ ३५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/९, क्षेत्रफळ २८० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१२, क्षेत्रफळ १२५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१३, क्षेत्रफळ ४५० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१५, क्षेत्रफळ ४८० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१९, क्षेत्रफळ ३०० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/६, क्षेत्रफळ ३५०० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१, क्षेत्रफळ ८३० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/७, क्षेत्रफळ ११७० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/११, क्षेत्रफळ २७२५ चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१४, क्षेत्रफळ ५१० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.३३/१८, क्षेत्रफळ ५२५ चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.२७/५/बी, क्षेत्रफळ २००० चौ.मी.; जमीन सर्व्हे क्र.७५/२ भाग, क्षेत्रफळ २८८०० चौ.मी., वृंदावन नगरी कॉम्प्लेक्स, गाव पामटेम्बी, ग्रामपंचायत पामच्या न्यायक्षेत्त, तालुका पालघर व जिल्हा पालघर-ठाणे, महाराष्ट्र-४०१५०४ येथील जागेचे सर्व भाग व खंड.

**ठिकाण: ठाणे**
**दिनांक: ०६.०३.२०२४**

**सही/- प्राधिकृत अधिकारी,**
**हीरो हौसिंग फायनान्स लिमिटेडकरिता**

---

**टिप्स इंडस्ट्रिज लिमिटेड**

The Must Have HITS

**नोंदणीकृत कार्यालय:** ६०१, ६वा मजला, दुर्गा चेंबर्स, लिंकिंग रोड, खार (प), मुंबई-४०००५२. **दूर.क्र.:** ९१-२२-६६४३११८८, ई-मेल: info@tips.in **वेबसाईट:**www.tips.in
**CIN: L92120MH1996PLC099359**

## टपाली मतदानाची सूचना

कंपनीच्या सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) निमय, २०१४, सुधारित (**व्यवस्थापन नियम**) सहवाचन कंपनी कायदा, २०१३ सुधारित (**अॅक्ट**) च्या अनुच्छेद १०८, ११० व अन्य लागू तरतूद , सामान्य सर्क्युलर क्र.०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर, २०२३ (यासंदर्भात पुर्वी प्रकाशित परिपत्रकांच्या सह पुढे) अंतर्गत मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालय द्वारे जारी (**एमसीए सर्क्युलर्स**), सेक्रेटरियल स्टॅंडर्ड सामान्य सभा भारताच्या कंपनी सेक्रेटरिज यांच्या संस्थेद्वारे जारी व सुधारित सीक्युरिटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ सुधारित (**एलओडीआर विनियमन**) यांच्या विनिमयन ४४ अंतर्गत व अन्य कोणत्याही लागू कायदा,नियम व विनियमन (कोणत्याही वैधानित सुधारणा वा पुन:एनॅक्टमेंट समवेत, वेळोवेळी सुधारित) टिप्स इंडस्ट्रिज लिमिटेड (**कंपनी**) यांचे सभासद यांची मंजूरी परोक्ष ई-मतदान (**ई-मतदान**) प्रक्रियेच्या मार्फत टपाल मतदान सूचनेत नमुद ठराव मंजूर करण्यासाठी आयोजित केला आहे.

| अ.क्र. | विशेष ठरावाचे तपशील |
|---|---|
| १ | कंपनीच्या समभागांचे बायबॅककरिता मान्यता. |

एमसीए सर्क्युलर्स अंतर्गत कंपनीने त्यांच्या सभासदांना कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्यासह दिनांक १ मार्च, २०२४ रोजी अनुसार (निर्धारित तारीख) यांच्यासह नोंदणीकृत त्यांच्या ईमेल आयडीवर ईलेक्ट्रॉनिक मोड मार्फत अतिविशेष अहवालासह टपाली मतदान सूचनेची मंगळवार, ५ मार्च, २०२४ रोजी ईलेक्ट्रॉनिक प्रत पाठवली आहे.

सदर सूचना कंपनीची वेबसाइट https://tips.in वर व स्टॉक एक्सचेंजेस अर्थात बीएसई लिमिटेड (**बीएसई**) https://www.bseindia.com व नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (**एनएसई**) https://www.nseindia.com यांच्या वेबसाइट वर कंपनीच्या इक्विटी शेअर्सची सूची उपलब्ध आहे व सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (**सीडीएसएल**) https://www.evotingindia.com वर उपलब्ध आहे.

एमसीए सर्क्युलर्सच्या तरतूदी अनुपालन सभासद परोक्ष ई-मतदान प्रक्रियेच्या मार्फत केवळ मतदान करावे. सभासदांचे मतदान हक्क कंपनीच्या इक्विटी शेअर्सच्या आधारावर निर्धारित तारखेस आयोजित केले आहे. कट ऑफ तारखेला सदस्य नसलेली कोणीही व्यक्ती ही टपाली मतदान सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने हाताळेल.

कंपनीने त्यांच्या सर्व सभासदांना ई-मतदान सुविधा प्रदान करण्याच्या हेतुकरिता सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (**सीडीएसएल**) ची सेवा नियुक्त केली आहे. परोक्ष ई-मतदानाची सुरुवात बुधवार, ६ मार्च, २०२४ रोजी ९.००वा. (भाप्रवे) होत आहे व गुरुवार, ४ एप्रिल, २०२४ रोजी ५.००वा. (भाप्रवे) बंद होत आहे. सदस्याने ठरावावरील दिलेले मत त्यास पुढे कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाही. सदर तारीख व वेळेनंतर रिमोट ई-वोटिंगची परवानगी दिली जाणार नाही.

सभासद ज्यांनी त्यांचा ई-मेल आयडी अजून अद्ययावत केला नसेल त्यांनी कृपया शेअर्स संबंधात सदर रजिस्ट्रर करावे व सदर शेअर्स ईलेक्ट्रॉनिक स्वरूपात डिपॉझिटरी मार्फत त्यांचे डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स मार्फत त्यांचे शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपात कंपनीच्या रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना लेखी स्वरूपात त्यांचा ईमेल rnt.helpdesk@linkintime.co.in करावा वा पोस्टा मार्फत सी १०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई-४०००८३ येथे लेखी स्वरूपात पाठवावे.

मंडळाने मे. एसएव्ही अॅण्ड असोसिएटस् एलएलपी, कार्यरत कंपनी सचिव यांचे पदसिद्ध भागीदार श्री. शिरीष शेठ्ये (एफसीएस:१९२६) यांची आणि त्यांच्या गैरहजेरीत कुमारी अपर्णा जोशी (एफसीएस:७१७२) यांची परीनिरीक्षक म्हणून ई-मतदान प्रक्रिया स्पष्ट व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्याकरिता आयोजित केले आहे.

परीनिरीक्षक यांनी त्यांचे अहवाल अध्यक्ष वा कोणतेही अन्य व्यक्ती यांना प्राधिकृत यांना ई-मतदानाच्या स्क्रुटिनीटी यांच्या पूर्ततेनंतर अध्यक्ष यांच्याद्वारे सादर करावे व अहवाल दि.६ एप्रिल, २०२४ रोजी घोषित केला जाईल व कंपनीची वेबसाइट https://tips.in वर प्रसिद्ध करण्यात येईल व सीडीएसएल https://www.evotingindia.com वेबसाइट वर प्रसिद्ध करण्यात आला आहे व स्टॉक एक्सचेंजेसला संपर्क साधावा.

कोणत्याही तक्रारी वा चौकशीकरिता ई-मतदान संबंधात भागधारक यांनी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅराथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंड, ना.म. जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०००१३ येथे पाठवावेत आणि ईमेल आयडी : helpdesk.evoting@cdslindia.com वर पाठवावे किंवा टोल फ्री क्र.१८००२२५५३३ वर संपर्क करावा.

मंडळाच्या आदेशान्वये
**टिप्स इंडस्ट्रिज लिमिटेडकरिता**
सही/-
ठिकाणः मुंबई **बिजल आर.पटेल**
दिनांकः ०५ मार्च, २०२४ कंपनी सचिव

---

**नमुना क्र.आयएनसी-२६**

(कंपनी (स्थापना) अधिनियम, २०१४ चे नियम ३० नुसार)

**केंद्र शासन, क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, मुंबई यांच्या समक्ष**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १३ चे उपकलम (४) आणि कंपनी (स्थापना) अधिनियम २०१४ चे नियम ३० चे नियम (५) चे खंड (अ) प्रकरणात

**आणि**

**शक्ती ऑटो वॉल्वस अॅण्ड इंजिनियरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड**

(सीआयएन:यु३५९००एमएच१९७२पीटीसी०१६०५६)

यांचे नोंदणीकृत कार्यालय: **रिफॅक्टरी हाऊस, एलबीएस मार्ग, कुर्ला, मुंबई-४०००७०, महाराष्ट्र.**

**...अर्जदार कंपनी/याचिकाकर्ता**

सर्वसामान्य जनतेस येथे सूचना देण्यात येत आहे की, **१४ फेब्रुवारी, २०२४** रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर विशेष ठरावानुसार कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय **महाराष्ट्र राज्यातून उत्तर प्रदेश राज्यात** स्थलांतरीत करण्याकरिता कंपनीचे मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशनचे बदलण्याच्या निश्चितीसाठी कंपनीद्वारे केंद्र शासन यांच्याकडे कंपनी कायदा २०१३ च्या कलम १३ अंतर्गत अर्ज करण्याचे योजिले आहे.

कोणा व्यक्तिच्या हितास कंपनीचे नोंदणीकृत कार्यालयाच्या नियोजित बदलामुळे काही बाधा येत असल्यास त्यांनी त्यांच्या हिताचे स्वरूप व विरोधाचे कारण नमूद केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे त्यांचे आक्षेप रजि. पोस्टाने किंवा गुंतवणूकदार तक्रार नमुना भरून **एमसीए-२१ पोर्टल (www.mca.gov.in)** वर सदर सूचना प्रकाशन तारखेपासून **१४ दिवसांच्या** आत **क्षेत्रिय संचालक, पश्चिम क्षेत्र, एव्हरेस्ट, ५वा मजला, १०० मरीन ड्राईव्ह, मुंबई-४००००२** या कार्यालयात पाठवावी तसेच एक प्रत अर्जदार कंपनीला खाली नमुद त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयात पाठवावे:

**रिफॅक्टरी हाऊस, एलबीएस मार्ग, कुर्ला, मुंबई-४०००७०, महाराष्ट्र.**

**शक्ती ऑटो वॉल्वस अॅण्ड इंजिनियरींग कंपनी प्रायव्हेट लिमिटेड**च्या वतीने व करिता
**सही/-**
**मुकेश गुप्ता**
दिनांक: ०६.०३.२०२४ **संचालक**
ठिकाण: मुंबई **डीआयएन:००९२५८८३**

---

**सार्वजनिक सूचना**

श्री/सौ. प्रसाद व्ही. भालिंगे हे ओम रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडचे सदस्य आहेत, त्यांचा पत्ता **जेराबाई वाडिया रोड, परेल (ई), मुंबई ४०००१२** आणि सोसायटीच्या इमारतीत **फ्लॅट क्र. बी-२०२** मध्ये राहत होते. ह्या दिनांक २७/१२/२०२२ रोजी कोणत्याही नामांकनाशिवाय निधन झाले. सोसायटी सूचना प्रकाशित झाल्यापासून काही दिवसांच्या आत सोसायटीच्या भांडवल / मालमत्तेमध्ये मृत सदस्याचे उक्त शेअर्स आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यासाठी वारस किंवा उत्तराधिकारी किंवा इतर दावेदार/आक्षेप घेणारे किंवा आक्षेप घेणाऱ्यांकडून दावे किंवा हरकती, सोसायटीच्या भांडवल / मालमत्तेमध्ये मृत सभासदाचे शेअर्स आणि हितसंबंध हस्तांतरित करण्यासाठी त्यांच्या दाव्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा कागदपत्रांच्या प्रती आणि इतर पुरावे मागवतात. वरील विहित कालावधीत कोणताही दावा/आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटीच्या उपविधीनुसार सोसायटीच्या भांडवलात / मालमत्तेमध्ये मृत सभासदाचे शेअर्स आणि हितसंबंध हाताळण्यास सोसायटी मुक्त असेल. सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मृत सभासदाच्या शेअर्स आणि हितसंबंधांच्या हस्तांतरणासाठी सोसायटीला प्राप्त झालेले दावे/आक्षेप, सोसायटीच्या उपनियमांनुसार प्रदान केलेल्या पद्धतीने निकाली काढले जातील. नोटीस प्रकाशित झाल्यापासून तिचा कालावधी संपल्याच्या तारखेपर्यंत सोसायटीच्या नोंदणीकृत उपनियमांची एक प्रत दावेदार / आक्षेप घेणाऱ्यांकडून सोसायटी / सोसायटीचे सचिव यांच्या कार्यालयात सकाळी ११:०० ते दुपारी ४:००च्या दरम्यान तपासणीसाठी उपलब्ध असणार.

**ओम रेसिडेन्सी को-ऑप. गृहनिर्माण संस्था लि. च्या वतीने**
**मा. सचिव / अध्यक्ष**

ठिकाण : मुंबई
तारीख: ०६/०३/२०२४

**मनप्रीत सलूजा, वकील**
दुकान क्रमांक ७, कोंडाजी चाळ, टाटा हॉस्पिटलजवळ, परळ, मुंबई-४०००१२.
संपर्क : ९८२०१७३४६७

---

**PUBLIC NOTICE**

Under the instructions and on behalf of my clients **MS. BERNADINE FRANCIS D'SOUZA**, and residing at Flat No. **A/705**, Madhupuri Apartments CHS Ltd, Gokhale Road, Dhanukar Wadi, Kandivali (W), Mumbai-400067 and **MR. GILBERT FRANCIS D'SOUZA** residing at **C-204**, Sai Complex, Link Road, Near Corporation Bank ATM, Kandarpada, Dahisar (West), Mumbai-400068, Maharashtra. I request you as under:

My clients says that their father **LATE FRANCIS THOMAS D'SOUZA** was the owner of the said flat premises situated at the above said address hereinafter referred to as the said flat. That said **LATE .FRANCIS THOMAS D'SOUZA** expired on **24/02/2014** at Mumbai. That after his death my clients and her mother **LATE CELESTINE FRANCIS D'SOUZA**, her Sisters i.e. **1) MRS. HELEN SILVEIRA, 2) MRS. DAPHNE DMELLO** and her brother **1) MR. GIBERT FRANCIS D'SOUZA**, had become the owners of the said Flat premises. That her brother **LATE MR. EDWARD FRANCIS D'SOUZA** expired on **02/09/2006**. That after death of said **LATE MR. EDWARD FRANCIS D'SOUZA** his wife **MRS. PATSY EDWARD D'SOUZA** also became the joint owner of said flat premises. That said **1) MRS. HELEN SILVEIRA, 2) MRS. DAPHNE DMELLO and 3) MRS. PATSY EDWARD D'SOUZA** have released their share in favour of my client No. **1. MS. BERNADINE FRANCIS D'SOUZA** by virtue of deed of release dated **31/10/2023**,bearing No.**15089/3/25**. That as said brothers and sisters have released their shares in respect of said flat in favour of my clients and hence she has become the **80% owner** of the said flat. That as **MR. GILBERT FRANCIS D'SOUZA** has not released the share in favour of anybody else and hence keep today he is **20% owner** of the said flat.

That if anybody makes any claim, right, title or interest in respect of the said flat then he should inform my clients or me within **7 days** from the receipt of this notice.

**Sd/- H.L. GUPTA**
**ADVOCATE HIGH COURT**
**Off. Shop No. 32, Avishkar Tower,**
**Opp. Ajanta Square,**
**Borivali (W), Mumbai-400092,**
**Tel. No. 9821271726 / 8879877558**
Place: Mumbai Date: 06/03/2024

---

केनरा बैंक Canara Bank
सिंडिकेट Syndicate

**अंबरनाथ पुर्व शाखा**
**१ला मजला, विजय शॉपिंग कॉम्प्लेक्स, स्टेशन रोड, अंबरनाथ पुर्व-४२१५०१.**

**लॉकर ग्राहकांना सूचना**

आम्ही येथे घोषित करीत आहोत की, आमचे अंबरनाथ पुर्व शाखा हे लवकरच प्रशस्त व सोयीस्कर ठिकाणी स्थलांतर केले जाणार आहे. नवीन पत्ता दुकान क्र.१-३, तळमजला, भैरव अपार्टमेंटस्, सुर्योदय कोहौसोलि., शिवाजी रोड, अंबरनाथ पुर्व, जिल्हा ठाणे. आमच्या विद्यमान लॉकर ग्राहकांनी आम्हाला लॉकरचे कार्यचलनासाठी आमच्या विद्यमान जागेवर संपर्क करु नये. आम्ही तुम्हाला विनंती करीत आहोत की, लॉकरमध्ये असलेल्या तुमच्या वस्तू काढून घ्याव्यात, जेणेकरुन प्रवासा दरम्यान हानी होणार नाही. बॅंकेकडून याबाबत आवश्यक ती सावधानता बाळगली जाईल. कृपया नोंद असावी की, लॉकर कॅबिनेटच्या स्थलांतरांच्या वेळी लॉकरमध्ये असलेल्या वस्तू जर हानी/नुकसान झाल्यास बॅंक जबाबदार असणार नाही.

**मुख्य व्यवस्थापक, कॅनरा बॅंक, अंबरनाथ पुर्व, ठाणे-४२१५०१.**

---

**जिलेट इंडिया लिमिटेड**

CIN:L28931MH1984PLC267130

**नोंदणीकृत कार्यालय:** पी अॅण्ड जी प्लाझा, कार्डिनल ग्रेशस मार्ग, चकाला, अंधेरी (पुर्व), मुंबई-४०००९९.
**दूर.:**(९१-२२) २८२६६०००, ९१ ८६५७५००५२४, **ई-मेल:** investorgil.im@pg.com, in.pg.com

**विषय: गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) यामध्ये कंपनीचे दावा न केलेले लाभांश व समभागांचे हस्तांतरण.**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १२४ सहवाचिता गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण व परतावा) अधिनियम, २०१६, (आयईपीएफ नियम) च्या तरतूदीनुसार सहकार मंत्रालयाद्वारे सुचित (एमसीए) प्रमाणे कंपनीद्वारे गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफ प्राधिकरण) द्वारे दिलेले डिपॉझिटरी सहभागीदारपैकी एकाकडे गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी गुढ खाते (आयईपीएफ गुढ खाते) यांच्या नावे ७ सलग वर्षे किंवा अधिक काळाकरिता भागधारकांद्वारे दावा न केलेले किंवा देण्यात न आलेले लाभांशसंदर्भात सर्व शेअर्स हस्तांतरण करणे आवश्यक आहे. नियमात नमुद विविध आवश्यकतानुसार वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करिता अंतरिम लाभांशाबाबत कंपनीने ज्या संबंधित भागधारकांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात हस्तांतरीत होण्यास पात्र आहेत त्या सर्वांना कंपनीकडे नोंद उपलब्ध पत्त्यावर वैयक्तीक पत्रव्यवहार केलेला आहे आणि आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात हस्तांतरणासाठी देय शेअर्स आणि अशा भागधारकांचे संपुर्ण तपशील in.pg.com वेबसाईटवर अपलोड केले आहे.

वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करिता अंतरिम लाभांशाबाबत जर कंपनीला संबंधित भागधारकांकडून **२० मे, २०२४** किंवा विस्तारीत अशा तारखेपर्यंत कोणताही पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यास खालीलप्रमाणे आयईपीएफ अधिनियमात विहित प्रक्रियेनुसार पुढील कोणतीही सूचना न देता आयईपीएफ अधिनियमात विहितप्रमाणे देय तारखेला आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात कंपनीद्वारे आयईपीएफ अधिनियमाच्या आवश्यकतांची पुर्तता करताना शेअर्स हस्तांतरीत केले जातील:

संबंधित भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की, अशा हस्तांतरणानंतर त्यांना आयईपीएफ अधिनियमाअंतर्गत विहित प्रक्रियेचे पालन करून आयईपीएफ प्राधिकरणाकडून सदर शेअर्ससह लाभांशावर दावा करता येईल. वर नमुदप्रमाणे हस्तांतरीत शेअर्स व सदर दावा न केलेले लाभांशसंदर्भात कंपनीवर कोणताही दावा सांगता येणार नाही.

वरील प्रकरणात काही प्रश्न असल्यास तुम्ही कंपनीचे निबंधक व भागहस्तांतरण प्रतिनिधी **मे. मास सर्विसेस लिमिटेड,** टी-३४, २रा मजला, ओखला इंडस्ट्रीयल एरिया, फेज २, नवी दिल्ली-११००२०, दूर.:०११-२६३८७२८१/८२, फॅक्स:०११-२६३८७३८४, ई-मेल: investor@masserv.com वर आणि/किंवा कंपनीचे वर नमुद नोंदणीकृत कार्यालयात लेखी कळवावे/संपर्क करावा.

**जिलेट इंडिया लिमिटेडकरीता**
**सही/-**
दिनांकः ०४ मार्च, २०२४ **फ्लेविआ मचाडो**
ठिकाणः मुंबई **कंपनी सचिव**

---

**प्रॉक्टर अॅण्ड गॅम्बल हायजिन अॅण्ड हेल्थ केअर लिमिटेड**

**सीआयएन: एल२४२३९एमएच१९६४पीएलसी०१२९७१**

**नोंद. कार्या.:** पी अॅण्ड जी प्लाझा, कार्डिनल ग्रेशस मार्ग, चकाला, अंधेरी (पू), मुंबई-४०००९९. **दूर.:**(९१-२२) २८२६६०००, +९१ ८६५७५१२३६८, **ई-मेल:**investorpghh.im@pg.com, **वेबसाईट:** in.pg.com

**समभागधारकांना सूचना**

**विषय: गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी (आयईपीएफ) यामध्ये कंपनीचे दावा न केलेले लाभांश व समभागांचे हस्तांतरण.**

कंपनी कायदा २०१३ चे कलम १२४ सहवाचिता गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण व परतावा) अधिनियम, २०१६, (आयईपीएफ नियम) च्या तरतूदीनुसार सहकार मंत्रालयाद्वारे सुचित (एमसीए) प्रमाणे कंपनीद्वारे गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी प्राधिकरण (आयईपीएफ प्राधिकरण) द्वारे दिलेले डिपॉझिटरी सहभागीदारपैकी एकाकडे गुंतवणूकदार शिक्षण व संरक्षण निधी गुढ खाते (आयईपीएफ गुढ खाते) यांच्या नावे ७ सलग वर्षे किंवा अधिक काळाकरिता भागधारकांद्वारे दावा न केलेले किंवा देण्यात न आलेले लाभांशसंदर्भात सर्व शेअर्स हस्तांतरण करणे आवश्यक आहे. नियमात नमुद विविध आवश्यकतानुसार वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करिता अंतरिम लाभांशाबाबत कंपनीने ज्या संबंधित भागधारकांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात हस्तांतरीत होण्यास पात्र आहेत त्या सर्वांना कंपनीकडे नोंद उपलब्ध पत्त्यावर वैयक्तीक पत्रव्यवहार केलेला आहे आणि आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात हस्तांतरणासाठी देय शेअर्स आणि अशा भागधारकांचे संपुर्ण तपशील in.pg.com वेबसाईटवर अपलोड केले आहे.

वित्तीय वर्ष २०१६-२०१७ करिता अंतरिम लाभांशाबाबत जर कंपनीला संबंधित भागधारकांकडून **१० मे, २०२४** किंवा विस्तारीत अशा तारखेपर्यंत कोणताही पत्रव्यवहार प्राप्त न झाल्यास खालीलप्रमाणे आयईपीएफ अधिनियमात विहित प्रक्रियेनुसार पुढील कोणतीही सूचना न देता आयईपीएफ अधिनियमात विहितप्रमाणे देय तारखेला आयईपीएफ प्राधिकरणाच्या डिमॅट खात्यात कंपनीद्वारे आयईपीएफ अधिनियमाच्या आवश्यकतांची पुर्तता करताना शेअर्स हस्तांतरीत केले जातील:

संबंधित भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी की, अशा हस्तांतरणानंतर त्यांना आयईपीएफ अधिनियमाअंतर्गत विहित प्रक्रियेचे पालन करून आयईपीएफ प्राधिकरणाकडून सदर शेअर्ससह लाभांशावर दावा करता येईल. वर नमुदप्रमाणे हस्तांतरीत शेअर्स व सदर दावा न केलेले लाभांशसंदर्भात कंपनीवर कोणताही दावा सांगता येणार नाही.

वरील प्रकरणात काही प्रश्न असल्यास तुम्ही कंपनीचे निबंधक व भागहस्तांतरण प्रतिनिधी **लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड,** सी-१०१, २४७ पार्क, एल.बी.एस. मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई-४०००८३, दूर.:०२२-४९१८६२७९, फॅक्स:०२२-४९१८६०६०, ई-मेल: rnt.helpdesk@linkintime.co.in वर आणि/किंवा कंपनीचे वर नमुद नोंदणीकृत कार्यालयात वर लेखी कळवावे/संपर्क करावा.

**प्रॉक्टर अॅण्ड गॅम्बल हायजीन अॅण्ड हेल्थ केअर लिमिटेडकरिता**
**सही/-**
ठिकाण: मुंबई **घनश्याम हेगडे**
दिनांक: ०४ मार्च, २०२४ **कंपनी सचिव**

---

**जाहिर सूचना**

माझे अशील **श्री. मंदार दत्तात्रय मुळे,** राहणार : २७/ २०८६, बोरिवली श्रीकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था, जूनी एम.एच. बी. वसाहत मुंबई- ४०००९१ यांच्यातर्फे मी असे जाहिर निवेदन / सूचना देत आहे कि, श्री. मंदार दत्तात्रय मुळे यांचे नमूद गृहनिर्माण संस्थेचे सदनिका वाटप पत्र व सदनिका ताबा पत्र हरविलेले असून त्यासंदर्भात त्यांनी एम.एच. बी. वसाहत पोलीस ठाणे बोरिवली, मुंबई येथे दिनांक ३ मार्च, २०२४ रोजी दस्तावेज हरविल्याचा अहवाल नोंदविलेला आहे. संबंधित अहवालाचा क्र. २८६३५ - २०२४ असा आहे. तसेच श्री. मुळे यांनी संबंधित अधिकारी / सरकारी कार्यालयांकडे सदर वाटप पत्र / ताबा पत्र यांच्या नक्कलप्रती प्राप्त करून देण्यासाठी अर्जही केलेला आहे. यास्तव माझे अशीलांतर्फे सदर सूचनापत्रकाद्वारे असे जाहिर निवेदन करीत आहे कि, ज्या कोणत्याही व्यक्तिस किंवा संस्थेस संबंधित नक्कल प्रती प्राप्त करवून देण्यासंदर्भात काही आक्षेप असल्यास अथवा तसा दावा करायचा असल्यास सदर जाहिर निवेदन प्रकाशित झालेल्या दिवसापासून १५ दिवसांचे आत तसा दावा करावा. १५ दिवसांनंतर केलेला कोणत्याही स्वरुपाचा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे.
दिनांक : ५/३/२०२४ **रचना र. चव्हाण**
ठिकाण : मुंबई अधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय

---

**न्यायालय कक्ष क्र.३२**

**मुंबई येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालय**

**व्यावसायिक दावा क्र.२९९/२०२२**
**दिवाणी प्रक्रिया सांकेतांकाचे कलम ओ.व्ही.आर.२०(१-ए) अंतर्गत**

तक्रार सादर - २८.०३.२०२२
तक्रार दाखल - ०६.०५.२०२२

आदेश ५ अंतर्गत, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे नियम २, व्यावसायिक न्यायालय कायदा, २०१५ च्या कलम १६ नियम दिवाणी प्रक्रियेचा सांकेतांक कलम २७ ओ.व्ही. आरआर १,५,७ आणि ओ.८ याचिकेच्या उत्तराचे समन्स.

**युनियन बॅंक ऑफ इंडिया, (ई-कॉर्पोरेशन बॅंक)**

बॅंकिंग कंपनीज (उपक्रमाचे प्राप्तीकरण व हस्तांतर) कायदा, १९७० च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली कॉर्पोरेट संस्था ज्याचे क्षेत्रीय कार्यालय युनियन बॅंक इमारत, ६ वा मजला, ६६/८० मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई-४०० ००१ आणि एक शाखा आहे, युनियन बॅंक ऑफ इंडिया (ई-कॉर्पोरेशन बॅंक), हिंद ज्योती इमारत, गुंजल मेन्शन, बॅरिस्टर नाथपै मार्ग, कॉटन ग्रीन, मुंबई - ४०००३३ यांच्यामार्फत प्रतिनिधित्व केले.

**...फिर्यादी**

**विरूद्ध**

**१. मे. मंथन टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स**
**२. श्री. प्रविण मधुकर साळवे (मालक)**

वयः प्रौढ, व्यवसाय-माहित नाही, पत्ता - खोली क्र.११४, १ला मजला, इमारत क्र ०२, वैमुला को-ऑप. लल्लुभाई कंपाउंड, टाटा नगर, मानखुर्द, मुंबई, महाराष्ट्र - ४०००४३.

**...प्रतिवादी**

प्रति,
**१. मे. मंथन टूर्स अॅण्ड ट्रॅव्हल्स**
**२. श्री. प्रविण मधुकर साळवे (मालक)**
वरनामित प्रतिवादी.

(दि.४.११.२०२३ रोजीच्या आदेशानुसार न्यायालय कक्ष क्र.३२ एच.एच.जे. श्री.व्ही.एस.गईके)

ज्याअर्थी वर नामित फिर्यादींनी तुमच्या विरोधात व्यावसायिक विवादबाबत दावा दाखल केलेला आहे आणि तुम्हाला येथे समन्स देण्यात येत आहे की, विद्यमान समन्सच्या सेवेपासून ३० दिवसांत लेखी अहवालासह सादर करावे आणि मान्य केल्याप्रमाणे लेखी अहवाल जर तुम्ही ३० दिवसांच्या कालावधीत किंवा अन्य इतर दिवशी, न्यायालयाने विहित केल्याप्रमाणे लेखी स्वरुपात नोंदीत कारणास्तव लेखी अहवाल सादर करण्यात कसूर केल्यास आणि न्यायालयास योग्य वाटेल त्याप्रमाणे शुल्काचा भरणा केल्यानंतर परंतु समन्सच्या सेवेच्या तारखेपासून १२० दिवसांच्या आत तुम्हाला रक्कम जमा करावी लागेल. समन्स सेवेच्या तारखेपासून १२० दिवसांच्या समाप्तीनंतर नोंदीवर घेण्यात येणारे लेखी अहवालास मान्यता न्यायालय देणार नाही आणि लेखी अहवाल सादर करण्याचे अधिकार काढून घेतले जातील.

**फिर्यादींनी विनंती केली आहे की:-**

अ. असे की, प्रकरण **'एल'** अर्थात दाव्याच्या तपशिलानुसार संपुर्ण परतफेड न्यायीक तारखेपासून तत्सम दराने पुढील व्याजासह आणि न्यायीक निवाडापर्यंत दावा दाखल केल्याच्या तारखेपासून ९.३५% (३१६५०६१२००५७०५९) आणि ७.५०% (३१६५०६९९००००२४) प्रतिवर्ष दराने वरील कर्ज खात्याअंतर्गत दावा दाखल केल्याच्या तारखेपासून लागू होणारी शिल्लक थकबाकी रक्कम, दावे दाखल केल्याच्या तारखेनुसार रु.३, २५, ८२५.५९/- (खाते क्र. ३१६५०६१२००५७०५९ रू.२,९३,९४२.५९ + (३१६५०६९९००००२४) रू.३१,८८३/-) ही सरासरी रक्कम प्रतिवादींनी संयुक्तपणे व वेगवेगळेपणे जमा करण्याचे आदेश देण्यात यावेत.

ब. प्रतिवादींच्या थकबाकीच्या भरपाईसाठी विक्रीची कार्यवाही समायोजित करण्यासाठी प्रतिवादींच्या मालकीच्या चार्ज केलेल्या आणि चार्ज न केलेल्या मालमत्तेवर निकाल देण्यापूर्वी संलग्नतेचा आदेश देण्यास माननीय न्यायालयाला आनंद होत आहे.

क. प्रतिवादीला या माननीय न्यायालयासमोर पासपोर्ट जमा करण्याचे निर्देश द्यावेत किंवा पर्यायाने त्यांना या माननीय न्यायालयाच्या पूर्वपरवानगीशिवाय देश सोडू नये असे निर्देश द्यावेत अशी विनंती करण्यात आली आहे.

ड. प्रतिवादींना या दाव्याची किंमत भरण्याचे निर्देश दिले जावेत.

ई. खटल्याच्या स्वरुपात आणि परिस्थितीत आणखी कोणताही दिलासा दिला जाऊ शकतो.

तुम्हाला येथे समन्स देण्यात येत आहे की, सदर मा.न्यायालयासमक्ष व्यक्तिशः किंवा सदर प्रस्ताव सूचनेसंदर्भात सर्व प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा असा एखादी व्यक्ती जो वर नमूद फिर्यादींच्या सर्व प्रश्नांना उत्तरे देऊ शकेल अशा इतर व्यक्तीसोबत उपस्थित रहावे आणि यापुढे तुम्हाला कळविण्यात येत आहे की, दाव्याचे तुमचे सुरक्षाकरिता तुमच्याकडे असलेली सर्व दस्तावेज किंवा अधिकार सादर करावेत आणि तुमच्या प्रकरणाच्या पृष्ठयर्थ तुमची इच्छा असल्यास फिर्यादींच्या प्रकरणासंदर्भातील पुरावे समाविष्ट दस्तावेज जर तुमच्या ताब्यात असतील तर ते तुमच्या वकिलासह पाठवावेत किंवा लेखी अहवालासह जोडपत्रांच्या यादीमध्ये असे सर्व दस्तावेज सादर करावेत.

माझ्या हस्ते व न्यायालयाच्या शिक्यानिशी देण्यात आले.

**आज दिनांकीत ०६ मार्च २०२४**

निबंधककरिता
शहर दिवाणी न्यायालय, बृहन्मुंबई
(शिक्का)
**मे. व्ही.बी. तिवारी अॅण्ड कंपनी**
**फिर्यादींचे वकील**
**४६, इस्लाम इमारत, १ला मजला, व्ही.एन. रोड, अकबरअलीज समोर, फोर्ट, मुंबई-४०००२३.**
**अॅड.कोडः एमएएच/१७९०/१९८३**
**मोबा.८९७६१४३१३०**
**ई-मेल:**vbtiwariandcompany@gmail.com